स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

मानव विज्ञान शाखा, विधी व सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पदवी करिता सादर करावयाचा संशोधन प्रबंधाचा आराखडा

“बौद्ध धम्म प्रसारात मुळावा, दाभड (बावरीनगर), पूर्णा या केंद्रांचे योगदान – एक अभ्यास.”

● संशोधक ●

श्री गायकवाड यादव कामाजी

एम.ए.इतिहास सेट नेट , एम.ए.मराठी सेट नेट

एम .ए.राज्यशास्त्र सेट नेट, एम.ए.अर्थशास्त्र सेट.

मो.न. 9921145703

Email : ykgaikwad33@gmail.com

जात प्रवर्ग –अनु.जाती (SC)

● मार्गदर्शक ●

प्रा.डॉ.बंडे शारदा गोविंदराव

(इतिहास विभाग प्रमुख)

स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय,

पूर्णा(जं.)ता.पूर्णा जि.परभणी

मो.न.94044975546,9850630480

Email : dr.sharadabande17400@gmail.com

● संशोधन केंद्र ●

हुतात्मा पानसरे महाविद्यालय,अर्जापूर

ता.बिलोली जि.नांदेड (RRC सप्टेंबर 2023)

“बौद्ध धम्म प्रसारात मुळावा, दाभड (बावरीनगर),पूर्णा या केंद्रांचे योगदान – एक अभ्यास.”

I प्रास्ताविक

जगाला शांतीचा संदेश देणारे सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी बौद्ध धम्माची स्थापना करून मानव जातीच्या कल्याणाचा मार्ग दाखविण्याचे महान कार्य केले.बौद्ध धम्माच्या उदयापूर्वी देखील धर्म होते परंतु त्या धर्मातील अवडंबराणे व मानवतेच्या हीन वागणुकीमुळे बौद्ध धम्मासाठी अनुकूल वातावरण तयार केले.बौद्ध धम्माची स्थापना सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी केली .मगध राजपुत्र सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या व्यक्तिमत्वाची सर्वसामान्यावर एक छाप उमटली. सिद्धार्थ गौतम बुद्धाचे उपदेश साधे व सर्वसामान्याला समजेल अशा भाषेत होते.त्यांच्या उपदेशात कोठेही कर्मकांडाला व अंधश्रद्धेला थारा नव्हता.

सिद्धार्थ गौतम बुद्धाचा जीवनाविषयीचा उपदेश सर्वसामान्याला प्रभावित करत होता.त्याचा परिणाम म्हणून अनेक राजांनी व श्रद्धाळू लोकांनी मोठमोठ्या लेण्या,स्तुपाद्वारे बौद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी मदत केली.बौद्ध धम्माचा प्रसार संपूर्ण जगात होण्याचे कारण म्हणजे अनेक देशातील यात्रेकरू बौद्ध धम्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात आले.भारतात अभ्यास केल्यानंतर अनेक बौद्ध साहित्य स्वत सोबत त्यांच्या देशात घेऊन गेले परिणामी बौद्ध साहित्य जगात प्रसिद्ध झाले म्हणून धम्माचा प्रसार वेगाने झाला.परकीय प्रवाशात प्रामुख्याने चीनी प्रवासी फाहायान ,हवेन्संग,इत्सिंग यांच समावेश होतो.

सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्या नंतर त्यांचे उपदेश जगासमोर आणणे सगळ्यात मोठे आव्हान होते.धम्माचा प्रसार करणे व सिद्धार्थ गौतम बुद्ध बुद्धाचे विचार एकत्रित करणे यासाठी बैठका घेण्यात आल्या.त्या बैठकीत धम्माच्या प्रसाराबाबत चर्चा झाली.त्या बैठकांना बौद्ध साहित्यात ‘बौद्ध संगीती’(बौद्ध धम्म परिषद) या नावाने ओळखल्या जाते.पहिली बौद्ध संगीती(बौद्ध धम्म परिषद) सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या महापरीनिर्वानानंतर लगेच झाली.राजगृह चे राजा अजातशत्रू हे बौद्ध धम्माचे आश्रय दाते होते.त्यांच्या मदतीने राजगृह या ठिकाणी पहिल्या बौद्ध धम्म संगीतीचे(बौद्ध धम्म परिषदचे) आयोजन करणायत आले.या बौद्ध धम्म संगीतीचे (बौद्ध धम्म परिषदचे) अध्यक्ष महाकश्यप हे होते. याच धम्म संगीतीत(बौद्ध धम्म परिषदेत) “त्रिपिटीकाची” रचना करण्यात आली .भगवान बुद्धाचे सर्व विचार संग्रहित करण्याचा प्रयत्न करण्याला व बौद्ध धम्म प्रसारात एक नवा अध्याय चालू झाला.त्यामुळे पहिल्या बौद्ध संगीतीस(बौद्ध धम्म परिषदेस) इतिहासात एक वेगळे स्थान आहे.

द्वितीय बौद्ध धम्म संगीतीचे(बौद्ध धम्म परिषद) आयोजन सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या महापरीनिर्वाणाच्या शंभर वर्षानंतर केले होते; परंतु भिक्खू संघाच्या नियमावरून या संगीतीत दोन गट तयार झाले. तिसरी बौद्ध धम्म संगीतीचे आयोजन सम्राट अशोकाच्या काळात करण्यात आले.या धम्म संगीतीचे अध्यक्ष प्रसिद्ध बौद्ध भिक्कू मोगलीपुत्त तिस्स हे होते. सर्वात जास्त काळ म्हणजे 9 महिने ही संगीती(बौद्ध धम्म परिषद) चालली होती .चौथी धम्म संगीतीचे आयोजन कुशांन शासकाच्या काळात करण्यात आले.या संगीतीचे अध्यक्ष आचार्य वासुमित्र हे होते.याच धम्म संगीतीत बौद्ध धम्म हीनयान व महायान या दोन पंथात विभाजित झाला.

प्राचीन काळातील बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे महत्वाचे कार्य महान शासक सम्राट अशोक द्वारे करण्यात आले.सम्राट अशोक बौद्ध धम्माचा उपासक होता व तो बौद्ध धम्म म्हणजे सर्व धर्माचे सार आहे असे मानत असे. सम्राट अशोक बौद्ध धम्माचा निस्सीम पालन कर्ता असल्या कारणाने धम्माप्रती असलेले कर्तव्य कटाक्षाने पालन करीत असे.अशोकाने बौद्ध संघासाठी दान दिले व बौद्ध भिक्षु व भिक्षुणी यांचा सन्मान केला.बौद्ध संघात निर्माण झालेल्या गटातील मतभेद दूर करण्याचा प्रयत्न केला.धम्म प्रसार वेगाने करण्याचे महान कार्य सम्राट अशोकाने केले.

सम्राट अशोकाने बौद्ध साहित्य व धम्म प्रसार करण्यासाठी धम्म लिपी वापरात आणली.भारता सोबतच जगातील अनेक देशात धम्म प्रसाराचे कार्य करण्यासाठी दूत व धम्म प्रसारक पाठविले,त्यासाठी महामात्र नावाचे मंन्त्री पद निर्माण केले.या पदाचा व कार्याचा उल्लेख सम्राट अशोकाच्या तेराव्या शिलालेखात आढळून येतो.धम्म प्रसार कार्य सिरीया ,श्रीलंका ,इजिप्त सारख्या देशात झाल्याचा उल्लेख देखील आढळून येतो.

महाराष्ट्रात किंवा भारतात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 1956 साली नागपूर येथे बौद्ध धम्माचा स्वीकार केला व बौद्ध धम्म महाराष्ट्रात पुनर्जीवित केला.यास धम्म चक्रप्रवर्तन असे म्हणतात.इतिहासात सम्राट अशोकाच्या काळात झालेले एक धम्मचक्र प्रवर्तन आणि आधुनिक काळात घडून आलेले हे एक धम्म चक्रप्रवर्तन होय.अशोकाविजायादशमी झालेल्या या धम्म चक्र प्रवर्तन दिनापासून पुन्हा बौद्ध धम्म प्रसार सुरु झाला.तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना केंद्रस्थानी मानून धम्म प्रसार करण्याचे महान कार्य आज धम्म प्रसार केंन्द्रे करत आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील मुळावा,नांदेड जिल्ह्यातील बावरीनगर दाभड व परभणी जिल्ह्यातील पूर्णा या धम्म केंद्राची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.या धम्म प्रसार केंद्रातील अनेक उपक्रम ,कार्य धम्म प्रसारासाठी उपयुक्त आहेत.या सर्व बाबीचा आढावा मी या शोधनिबंधात घेणार आहे.

II अध्ययन विषयाची निवड :-

कोणत्याही संशोधन कार्याला सुरवात करण्यापूर्वी संशोधन विषयाची किंवा अध्ययन विषयाची निवड करणे आवश्यक असते.

भारताची जगामध्ये ओळख निर्माण करणाऱ्या बौद्ध धम्माची जन्मभूमी भारत हे राष्ट्र आहे.जगभरात बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार भारतातुनच झाला आहे.तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाची सत्य,अहिंसा याची शिकवण जगाला देण्याचे महान कार्य भारताकडून घडते.प्राचीन काळात बौद्ध धम्म प्रसार करण्याचे कार्य भिक्कू संघाकडून होत असताना त्यांना अनेक सम्राट,राजे यांची मदत व्हायची.महान शासक सम्राट अशोकाचे कार्य बौद्ध धम्म प्रसारात अत्यंत महत्वाचे आहे.सम्राट अशोकाच्या काळात संघमित्रा व मिलिंद यांना श्रीलंका या देशात धम्म प्रसारासाठी पाठविल्याची नोंद इतिहासात आहे.

सुमारे 1200 वर्षाचा इतिहासातील कालखंड बौद्धांचा इतिहास म्हणून ओळखला जातो परंतु पुढील काळात बौद्ध धम्माची पीछेहाट झाल्याची दिसते.महाराष्ट्रात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आशोकाविजयादशमी दिनी धम्मचक्र प्रवर्तन करून बौद्ध धम्माला एक उर्जिताअवस्था प्राप्त करून दिली आहे.त्यानंतर महाराष्ट्रात व भारतात धम्म प्रसार कार्य वेगाने घडून येत आहे.यासाठी अनेक बौद्ध भिक्कुनी धम्म प्रसार केंद्रे स्थापन केली आहेत.महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यातील मुळावा,नांदेड जिल्ह्यातील बावरीनगर दाभड,परभणी जिल्ह्यातील पूर्णा या धम्म प्रसार केंद्रांनी अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली आहे.अत्यंत महत्वाचे कार्य करणाऱ्या या धम्म प्रसार केंद्राची माहिती सर्वसामाण्याना व्हावी या उद्देशाने मी या संशोधन विषयाची निवड केली आहे.

III संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांची क्रमवारपणे केलेली मांडणी. इतिहासाची लेखन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून करण्यात येत असते. म्हणून प्रत्येक लेखकाचा वेगवेगळ्या दृष्टिकोन असतो. त्याच्या प्रत्येक बाबीची नोंद करणे संशोधकाला शक्य नसते. विज्ञानातील प्रयोगासारखे प्रात्यक्षिक व निरीक्षण याचा वापर करून घटना पुन्हा पडताळता येत नाहीत. “बौद्ध धम्मप्रसारात मुळावा,दाभड (बावरीनगर),पुर्णा या केंद्रांचे योगदान-एक अभ्यास”. याचे संशोधन केले जाणार आहे. या विषयाची माहिती घेताना म्हणजे संशोधन करताना त्याची व्याप्ती व मर्यादा ठरविणे गरजेचे.

अन्यथा संशोधन भरकटण्याची शक्यता असते; म्हणून माझे संशोधन बौद्ध धम्माचा प्रसार मुळावा येथील प्रसार केंद्राचे कार्य,बावरीनगर दाभड येथील प्रसार केंद्राचे कार्य व पुर्णा येथील धम्म प्रसार केंद्राचे कार्य या बाबीपर्यंतच मर्यादित आ.हे विषयानुरूप आवश्यक तिथे इतर बाबींचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

IV संशोधन आराखडा :-

कोणत्याही प्रकारचे कार्य करण्यासाठी नियोजन अतिशय महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे संशोधन करण्यासाठी संशोधन आराखड्याची आवश्यकता असते. याचा परिणाम म्हणजे संशोधकाचे कार्य सुलभ व सहज होते. संशोधकाची श्रम व पैशाची बचत होते. संशोधन आराखडा चांगल्या प्रकारचा असेल तर संशोधनांमध्ये एकसुत्रीपणा आढळून येतो. "बौद्ध धम्मप्रसारात मुळावा,दाभड(बावरीनगर),पुर्णा या केंद्रांचे योगदान-एक अभ्यास" या विषयाचा अभ्यास करताना ऐतिहासिक,वर्णनात्मक,विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे.

V संशोधन पद्धती :-

"बौद्ध धम्मप्रसारात मुळावा,दाभड(बावरीनगर),पुर्णा या केंद्रांचे योगदान-एक अभ्यास" या विषयाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तुलनात्मक,विश्लेषणात्मक,वर्णनात्मक व चिकित्सक पद्धतीने माहिती गोळा करण्यात आलेली आहे. ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये इतिहासाच्या घटना चिकित्सकपणे व विश्वसनीतीच्या आधारावर तटस्थ राहुन माहिती गोळा करण्यात येते.

VI संशोधनाची साधने :-

"बौद्ध धम्मप्रसारात मुळावा,दाभड(बावरीनगर),पुर्णा या केंद्रांचे योगदान-एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे. या विषयावर संशोधन करण्यासाठी प्राचीन ग्रंथ, प्रकाशित साहित्य, आठवणी, वृत्तपत्रांचे अंक, संदर्भ ग्रंथ, मासिके, शब्दकोश शोध पुस्तिका, स्मरणिका ,शोध प्रबंध,मुलाखती, प्रश्नावली ,प्रत्यक्ष भेट यासारख्या साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

VII संशोधन विषयाची उद्दिष्टे :-

1) बौद्ध धम्माच्या माहितीचे संकलन करून महाराष्ट्रातील मुळावा,बावरीनगर दाभड,पुर्णा येथील धम्म प्रसारकेंद्राची ओळख करून देणे.
2) मुळावा,बावरीनगर दाभड,पुर्णा येथील धम्म प्रसारकेंद्राच्या उदिष्ट्यासोबतच चालणारया विविध उपक्रमांची माहिती संकलित करणे.
3) मुळावा,बावरीनगर दाभड,पुर्णा येथील धम्म प्रसारकेंद्रातील पूज्य भदंत यांच्या कार्याविषयी व श्रामणे शिबिरांविषयी अध्ययन करणे.
4) मुळावा,बावरीनगर दाभड,पुर्णा येथील धम्म प्रसारकेंद्रात चालणाऱ्या शिक्षण केंद्रा विषयी माहिती संकलित करणे.
5) मुळावा,बावरीनगर दाभड,पुर्णा येथील धम्म प्रसारकेंद्राची धम्मप्रसाराबाबतची माहिती संकलित करणे.

VIII संशोधन विषयाची गृहीतके :-

1) बौद्ध धम्मप्रसारात अनेक व्यक्तींनी योगदान दिलेले आहे आणि प्राचीन काळाप्रमाणे आधुनिक काळातही धम्मप्रसाराचे कार्य चालते.
2) मुळावा,बावरीनगर दाभड, पूर्णा या ठिकाणी श्रामणे शिबिर मार्फत मोठ्या प्रमाणात धम्मा विषयी ज्ञान देण्यात येते.
3) मुळावा,बावरीनगर दाभड,पूर्णा येथील अनेक भदंत धम्मप्रसाराचे कार्यकरतात,येथे दरवर्षी धम्म परिषदेचे आयोजन करून,विविध देशांतील भंतेजींचे प्रवचन धम्म देसना होत असते.
4) बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात त्यामध्ये येथील भदंत पूज्य भिक्खू संघ गावोगावी धम्मप्रसारा कार्य करतात,
5) बौद्ध धम्मपरिषदाचे आयोजनामुळे बौद्ध तत्त्वज्ञानाची पुनरावृत्ती होते धम्मप्रसारात या धम्मप्रसार केंद्रांची आवश्यकता असते.
6) बौद्ध धम्मप्रसारात मुळावा, बावरीनगर दाभड, पूर्णा या धम्म प्रसार केंद्राचे महत्त्वाचे स्थान आहे.

IX प्रकरण नियोजन :-

● प्रकरण-1 ●

बौद्ध धर्म स्थापना व संकल्पना

बौद्ध धम्माची स्थापना व तत्वज्ञान यांची संकल्पना या प्रकरणांमध्ये मांडण्यात आलेली आहे. बौद्ध धर्म स्थापना साठीची परिस्थिती ,त्याची पार्श्वभूमी याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे. त्याचबरोबर बौद्ध धम्मातील महत्त्वाच्या संकल्पना त्याची माहिती या प्रकरणांमध्ये देण्यात येणार आहे.

● प्रकरण-2 ●

बौद्ध धम्माचे धार्मिक धोरण व प्रसार

बौद्ध धम्माने जगाला साहिस्नुतेची शिकवण दिलेली आहे. बौद्ध धम्माचे धार्मिक धोरण सर्व समावेशक असे होते, याविषयी या पाठात विचार मांडण्यात येणार आहे. बौद्ध धम्माला कशाप्रकारे राजाश्राय मिळाला ,त्याचप्रमाणे प्राचीन काळात बौद्ध धम्माचा प्रसार कशाप्रकारे झाला व या धम्मप्रसारात कोणकोणत्या सम्राट राजे यांनी मदत केली ,याची माहिती या पाठात घेण्यात येणार आहे.

● प्रकरण-3 ●

बौद्ध धम्मप्रसारात मुळावा धम्मप्रसार केंद्राचे योगदान

या प्रकरणात मुळावा या गावात स्थापन करण्यात आलेली विहार हे धम्म प्रसार केंद्र आहे. तेथील पूज्य भदंत यांचे कार्य, मुळावा येथे करण्यात येणारे विविध सामाजिक कार्य, शिक्षण केंद्रातील उपक्रम, धम्मपरिषदा यांची माहिती घेण्यात येणार आहे.

● प्रकरण-4 ●

बौद्ध धम्मप्रसारात बावरीनगर दाभड धम्मप्रसारकेंद्राचे योगदान

या प्रकरणामध्ये बावरीनगरचा इतिहास ,बावरीनगर दाभडचे महत्व, बावरीनगर दाभड येथे होणारे विविध कार्यक्रम, बावरीनगर दाभड येथील धम्म परिषद, त्याचबरोबर धम्मप्रसारासाठी करण्यात येणारी कार्य, पुज्य भदंत त्यांचे कार्य याबद्दल माहिती या प्रकरणात येणार.

● प्रकरण-5 ●

बौद्ध धम्मप्रसारात पुर्णा या धम्मप्रसार केंद्राचे योगदान

या प्रकरणांमध्ये पुर्णा येथे स्थापन करण्यात आलेले धम्मप्रसार केंद्र ,तेथील भदंत यांचे कार्य, पुर्णा येथे राबविण्यात येणारे विविध उपक्रम, परिषदा ,शिबिरे याबाबत माहिती या प्रकरनामध्ये आहे.

• प्रकरण-6 •

उपसंहार

या प्रकरणांमध्ये वरील पाच प्रकरणांच्या अनुषंगाने बौद्ध धम्मातील प्रचार प्रसार केंद्रांचे कार्य विशेष संदर्भ मुळावा, बावरीनगर ,दाभड, पूर्णा यांच्या कार्याचा चिकित्सक व तुलनात्मक उपसंहार या प्रकरणांमध्ये येणार आहे. पाच प्रकरणांमध्ये वस्तुनिष्ठ पद्धतीने घेतलेला आढावा, विविध संशोधक, विद्वान, इतिहासकार यांची मत लक्षात घेणार आहे. वस्तुनिष्ठ निष्कर्ष प्रकरणामध्ये काढण्यात येणार आहे.

IX संदर्भ

1) आंबेडकर डॉ. बाबासाहेब माझी आत्मकथा.
2) भदंत प्रा.सत्यपाल,महापरिनिब्बान सूक्त (मूळ पाली-मराठी), प्रकाशन- भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था मुळावा,ता-उमरखेड,जि- यवतमाळ.
3) भदंत प्रा.एम.सत्यपाल , सूक्तनिपात (पाली आणि मराठी), प्रकाशन- भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था मुळावा ता-उमरखेड,जि- यवतमाळ.
4) भदंत प्रा.डॉ.एम.सत्यपाल, धम्मचक्र अनुप्रवर्तनाच्या पाऊलखुणा, प्रकाशक- भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था मुळावा,ता-उमरखेड,जि- यवतमाळ.
5) भालेराव व्हि.के., भदंत कश्यप महाथेरो, मिलिंद प्रकाशन नांदेड 2011
6) मोरे मा.श., बुद्ध धम्माचे संदेश वाहक भाग-2, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद-2004.
7) मोरे मा.श., महाराष्ट्रातील बुद्ध धम्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद-2007.
8) कोसंबी आचार्य धर्मानंद, बुद्ध धम्मावरील चार निबंध, 02 बौद्ध संघाचा परिचय.
9) गिरविले प्रल्हाद अनुवाद, बौद्धांचे आठ महातीर्थ चंद्रशेन बौद्ध.
10)धम्म दर्पण मासिक, भारतीय बौद्ध महासभा ,दिल्ली.
11)जाधव डी.आर., बौद्ध धर्माचे भारतीय संस्कृतीला योगदान, सुगाव प्रकाशन, पुणे.
12)डॉ.आंबेडकर बी.आर., हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान, अनुवाद दळवी म.य., सुगाव प्रकाशन, पुणे.
13)सोनवणे सुनील, बौद्ध कला आणि साहित्य, अस्मिता शैक्षणिक धम्म विषयक साहित्य चळवळ,उल्हासनगर, महाराष्ट्र.
14)सावंत डी.टी., बौद्ध धम्माची पहिली संगीती, सुगावा प्रकाशन, पुणे.(डिसें. 2009)

15)गांजरे मा.फ., धम्मपद (मराठी अनुवादासह), अशोक प्रकाशन, 3 बॅनर्जी लेआउट, नागपूर 1990.
16)डोंगरे संजय प्रल्हाद, धम्म संगिती ,उषा वाघ, सुगावा प्रकाशन, पुणे 2008.
17)देशमुख डॉ. किरण, असाही मराठवाडा, निर्मल प्रकाशन, नांदेड 2012.
18)डॉ. आंबेडकर बाबासाहेब, भारतातील बौद्ध धम्म चळवळ, प्रकाशक डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच, यवतमाळ. प्रथम आवृत्ती 5 जुलै 2002.
19)कठारे अनिल, बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान, कल्पना प्रकाशन ,नांदेड. मे 2001.
20)कराडे प्रा.जगन्नाथ, धम्मक्रांतीची फलश्रुती, प्रकाशक के राहुल, तक्षशिला प्रकाशन, पुणे.
21)केतकर श्रीधर व्यंकटेश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग चौथा- बुद्धोत्तर जग,प्रकाशक महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लि.नागपूर, सदाशिव पेठ, पुणे.
22)कोसंबी प्रा.धर्मानंद,बोधिसत्वाच्या जातक कथा अर्थात दस पारमिता, सुधीर प्रकाशन ,गणेश नगर, बोरगाव, जि.वर्धा.
23)प्रा. भिख्खू एम.सत्यपाल, संबोधी स्मरणिका अ.भा. बौद्ध धम्म परिषद, महाविहार,बावरी नगर, दाभड, यातील लेख-प्राचीन ऐतिहासिक स्थळ, बावरी नगर -अरहंत नगरी.
24)भालेराव व्हि.के., संबोधी स्मरणिका, बारावी बौद्ध धम्म परिषद, महाविहार बावरी नगर दाभड नांदेड, 3 जानेवारी 1991 यातील लेख महाविहार, बावरी नगर संकल्प कार्यारंग.
25)आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन,नागपूर.
26)कुऱ्हाडे बी.एम., भारत शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
27)वेलणकर जयंत, प्रबंध कसा लिहावा, साहित्य प्रकाशन प्रसार केंद्र,नागपूर.
28)कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
29)नरसु पी.लक्ष्मी , मूळ लेखक डॉ.कौशल्यान भदंत आनंद, इसेन्स ऑफ बुद्धिझम,बौद्ध धम्म का सार हिंदी अनुवाद, सिद्धार्थ गौतम बुद्ध शिक्षण व संस्कृती समिती, धनसारी, जि- अलीगढ.
30)भदंत डॉ. आनंद कौशल्यान, भगवान बुद्ध और उनका धर्म,डॉ.भीमराव आंबेडकर, बुद्धभूमी प्रकाशन नागपूर,
31) गोखले बी.बी., बुद्धीजम अंड अशोक बडोदा(1948).
32)गोयल श्रीराम, नंद मौर्य साम्राज्य का इतिहास, कुसुमांजली प्रकाशन, मेरठ(1992).
33) डॉ.जैन धर्मचंद, बौद्ध दर्शन के प्रमुख सिद्धांत बौद्ध अध्ययन केंद्र, जोधपुर
34) डॉ.पांडे गोविंद चंद्र, बौद्ध धर्म के विकास का इतिहास, हिंदी समिती सूचना विभाग, लखनऊ(1963).
35) बापट पी.पी., बौद्ध धर्म 2500 वर्ष, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली(1997).
36) डॉ.सिंह प्रियसेन, भारत के प्रमुख बौद्ध तीर्थस्थळ, इस्टर्न बुक ,दिल्ली(1993).

● संशोधक ●

श्री गायकवाड यादव कामाजी

एम.ए.इतिहास सेट नेट , एम.ए.मराठी सेट नेट

एम.ए.राज्यशास्त्र सेट नेट, एम.ए.अर्थशास्त्र सेट

मो.न.9921145703

Email : ykgaikwad33@gmail.com

● मार्गदर्शक ●

प्रा.डॉ.बंडे शारदा गोविंदराव

(इतिहास विभाग प्रमुख)

स्वातंत्र्य सैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय,

पूर्णा(जं.)ता.पूर्णा जि.परभणी

मो.न. 94044975546,9850630480

Email : dr.sharadabande17400@gmail.com